**दिनांक २०/०९/२०१९ कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीच्या २६ व्या बैठकीची टिपणी**
**मा. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.**

**१.मागिल बैठकीचा आढावा.**

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय</th><th>झालेली चर्चा व घेण्यात आलेला निर्णय</th><th>कार्यवाही करणारी यंत्रणा</th></tr>
<tr><td>१</td><td>श्री. सुनिल अगरवाल<br><br>Destruction of Uran wetlands & Mangroves - Dastaan Node.</td><td>• या तक्रारी संदर्भात सदस्य सचिवांनी तक्रारदारांनी दिलेल्या GPS Co-ordination नुसार सदरचे क्षेत्र हे पाणथळ नसल्याचे दिसून येते.<br>• सदर ठिकाणी असलेला नाला संरक्षीत करण्याच्या सुचना समितीने दिल्या व त्या अनुषंगाने अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींना दिल्या आहेत.</td><td>जिल्हाधिकारी रायगड</td></tr>
<tr><td>२</td><td>श्री. धिरज परब:- पालघर जिल्हयातील वसई तालुक्यात वरसावे पूल महामार्गापासून लोढा जैन मंदिर पर्यंतच्या परिसरात कांदळवन, पाणथळचा नाश करुन,सीआरझेड,इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये चाललेल्या प्रचंड भराव-बांधकामा प्रकरणी.</td><td rowspan="2">• या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी पालघर यांच्या दि.२८.०६.२०१९ रोजीच्या अहवालानुसार मंडळ अधिकारी यांच्यामार्फत ई.पी.ए अंतर्गत गुन्हा दाखल झालेला असून FIR दाखल करण्यात आलेला आहे असे वसई-विरार महानगरपालिकेच्या प्रतिनिधींनी सांगितले.<br>• समितीने FIR दाखल करण्याबाबत SDO व त्या वरील वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत FIR दाखल करण्याच्या सुचना दिल्या आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदर जागेवरील भराव केल्यामुळे दंडाची रक्कम आणि Restoration साठी लागणाऱ्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन जागेवर कांदळवन लागवडीची कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीने दिले.</td><td>तहसिलदार वसई<br><br>(जिल्हाधिकारी पालघर)</td></tr>
<tr><td>३</td><td>श्री. धिरज परब: - भाईंदर पूर्व, जेसलपार्क येथे वसई खाडी किनारी कांदळवन, पाणथळ, सीआरझेड १ मध्ये मेरीटाईम बोर्ड ने जेट्टी, रॅम्प व पालिकेने रस्ता बांधकामे केले बाबत.</td><td>तहसिलदार ठाणे<br><br>(जिल्हाधिकारी ठाणे)</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | श्री. धिरज परब: - जेसलपार्क खाडी पात्रात व किनारी कांदळवन, पाणथळ मध्ये महापालिके कडून बेकायदा नाले बांधून सांडपाणी सोडणे तसेच कचरा, निर्माल्य प्लॅस्टिक व अन्य साहित्य टाकून पर्यावरणाचा ऱ्हास | • या तक्रारी संदर्भात समितीने मेरी टाईम बोर्ड बांधण्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या घेण्यात आल्या असतील त्या संबंधीचा सर्वे नंबर, झालेला खर्चयाबाबतचा सविस्तर अहवाल देण्याच्या सूचना मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना सांगितले. | मिरा-भाईंदर महानगरपालिका<br>आणि<br>तहसिलदार ठाणे |
| ५ | श्री. स्टॅलीन डी –दि.३१.०१.२०१९ Please act to stop illegal destruction of wetlands In Wadala /nearby areas | • समितीने तक्रारदार श्री. स्टॅलीन डी यांच्या सोबत संपर्क साधून सदर जागेवरील डेब्रिज हटविवून १५ दिवसात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे आदेश कार्यकारी अभियंता सॉलीड वेस्ट मॅनेजमेंट यांना दिल्या आहेत.<br>• तसेच सदर जागेवर कांदळवनाची लागवड करण्याच्या सूचना देखील समितीने मुंबई महानगरपालिकेला दिल्या. | जिल्हाधिकारी मुंबई शहर |
| ६ | Well Wisher and Environment activist दि.२५.०३.२०१९<br>Dumping of C & D Waste, Cutting of Mangroves and Destruction of the Wetland in Village Kasheli Tal. Bhiwandi Dis. Thane. | • या तक्रारी संदर्भात तहसलिदार ठाणे यांच्या अहवालानुसार सदर जमिनीवर भातशेतीचे खाचरे दिसून आले. तथापी सदर स.नं. चे बाजूस खार फुटीची विरळ प्रमाणात झाडे असल्याचे दिसून येते तसेच डेब्रिज भरणी केलेल्या जमिनीमध्ये मॅग्रोज प्रजातीच्या झाडांचा ऱ्हास झाल्याचे दिसून येत नाही.<br>• त्या अनुषंगाने सदरची तक्रार बंद करणेस शिफारस करण्यात येत आहे. | जिल्हाधिकारी ठाणे<br>तहसिलदार ठाणे अहवाल प्राप्त |
| ७ | श्री. स्टॅलिन डी<br>दि.१८.०३.२०१९ Continous reclamation and construction on Wetlands at Bhayanderpada Ghodbunder road by squarefeet Group. | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार ठाणे यांनी स्थळ पाणी केली असून या ठिकणी महानगरपालिकेच्या परवानगीने काम चालू आहे व काही ठिकाणी इमारतीच्या बांधकामे चालू आहेत.<br>• तसेच सदर ठिकाणी पाणथळ आहे किंवा कसे याबाबत वन विभागाकडून अभिप्राय घेण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तहसिलदार ठाणे यांना भाईंदरपाडा हे क्षेत्र वेटलॅन्ड क्षेत्रात येते की नाही याबाबत तपासणीसाठी आवश्यक GPS Location सदस्य सचिवांना तपासणीसाठी देण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | श्री. सुनिल अगरवाल व<br>श्री. स्टॅलिन डी. २४.०३.२०१९<br>Drying up of Panje Wetland in Uran & debris dumping in Bhenkhal<br>Wetland atlas नुसार पाणजे वेटलँड हे वेटलॅन्ड क्षेत्र नाही. | • या तक्रारी संदर्भात सदस्य सचिवांनी MRSAC नकाशाच्या पाहणी नुसार बेनखल येथे पाणथळ असल्याचे सांगितले.<br>• सदर ठिकाणी असलेले डेब्रिज काही प्रमाणात काढण्यात आले आहे असे सिडको यांच्या प्रतिनिधींनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने उर्वरित डेब्रिज काढण्याच्या सूचना सिडको यांना दिल्या व त्याबाबतचा अहवाल १५ दिवसात सदस्य सचिवांना देण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी रायगड व सिडको |
| ९ | श्री. स्टॅलिन डी :- दि.२७.०६.२०१९<br><br>Destruction of Wetland by CIDCO | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार रायगड आणि सिडको यांनी स्थळ पहाणी केली असून सिडको यांच्या प्रतिनिधींनी ही तक्रार JNPT अंतर्गत येत असल्याचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने सिडको आणि JNPT यांना योग्य ती कार्यवाही करुन अहवाल तहसिलदार रायगड यांच्याकडून समितीस सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी रायगड व सिडको |

## नवीन प्राप्त तक्रारी

| तक्रार क्र. | तक्रारदार व तक्रारीचा विषय | कार्यवाही करणारी यंत्रणा | शेरा |
|---|---|---|---|
| १ | **श्री. समिर सुभाष वर्तक आणि मॅकेन्झी डांबरे दि.२२.०२.२०१९**<br>पाणथळ जागेवरील अतिक्रमणाबाबत शासनाच्या उदासीन धोरणाबाबत बेमुदत उपोषणाबाबत. | जिल्हाधिकारी पालघर | सदरची तक्रार पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे. |